'वेगळी ध्वनिमुद्रिका काढणे राहूनच गेले'

पान १ वरून ➤ संगीत बांधताना स्पर्धेतील संगीतकारालाही त्यांच्या चालींचा विचार करावा लागेल इतक्या ताकदीच्या त्यांच्या चाली होत्या. सुरावटीतील सोपेपणा आणि काव्य कुठले घ्यावे याची अचूक निवड यामुळे त्यांची चित्रपटगीते गाजली. आरंभीच्या काळात त्यांच्याकडे मी गायलेल्या गाण्यांपैकी आवडलेली गाणी 'सजनी' चित्रपटातील होती. त्याच काळात मालती-माधव, रत्नघर असे चित्रपट आले, त्यातील गीतेही छान होती. हिंदी चित्रपटाला त्यांनी संगीत दिले. पण ते काहीसे मराठी वळणाचे होते. उदा. त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मी गायलेली 'ज्योती कलश झलके' ही मराठीतील मूळ भूपाळीच वाटते.

बाबूजींकडे मी खूप कमी गाणी गायले. आशा तुलनेने त्यांच्याकडे अधिक गायली. त्यांच्यासमवेत वेगळ्या पद्धतीच्या भावगीतांची ध्वनिमुद्रिका काढावी, अशी माझी इच्छा होती. पण आम्ही दोघेही अन्य कामांत व्यस्त असल्याने ते राहून गेले. आणखी त्यांची मी गायलेली गाणी आठवतात ती म्हणजे 'बघून बघून वाट तुझी नयन थांबले', किंवा 'त्या नगरीची राणी सखया'. त्यातील आपल्या सर्वाधिक लक्षात आहे ते म्हणजे भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटातील बाबूजींबरोबर गायलेले एकमेव द्वंद्वगीत- 'रात्र अर्धी , चांद अर्धा त्यात सुटला गारवा',

बाबूजींच्या पत्नी ललिताबाई आणि मी एकत्र गायचो. त्या तशा आधीपासून गाणाऱ्या आणि मी नुकतीच सुरुवात केलेली. तरी आम्ही बरोबर ध्वनिमुद्रणासाठी लोकलमधून जायचो. त्यावेळी गाडीत त्या सतत स्वेटर विणत असत. गीतरामायणातील 'मज सांग लक्ष्मणा, जाऊ कुठे' हे एक गीतही मी गायले होते, अशी आठवण लतादीदींनी सांगितली.

गुजरातमध्ये निवडणूक आयोग पथक पाठवणार

नवी दिल्ली, २९ जुलै : हिंसाचारग्रस्त गुजरातमध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्याजोगी परिस्थिती आहे का, याची पाहणी करण्यासाठी नऊजणांचे पथक पाठविण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे.

३१ जुलैपासून हे पथक अहमदाबादमध्ये कार्य सुरू करील, असे सांगण्यात आले. दोन निवडणूक उपायुक्त व सात अन्य अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या पथकातर्फे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीचा आढावा घेतला जाईल.

- (पी.टी.आय.)

'संगीत शारदेचा समा

पुणे, २९ जुलै (प्रतिनिधी) आयुष्यभर संगीत शारदेची समर्पित सेवा करणारा स्वरोपासक आपल्या असंख्य अवीट सुरावटींना मागे ठेवून नादब्रह्मात विलीन झाला आहे, अशा शब्दांत अनेक मान्यवरांनी दिवंगत संगीतकार सुधीर फडके यांना श्रद्धांजली अर्पण केली.

पं. भीमसेन जोशी : फडकेंचे आकस्मिक निधन होईल असे वाटले नव्हते. चित्रपटाच्या कथानकाला अनुसरून त्यांनी दिलेले संगीत मला आवडले. त्यांनी रचलेल्या चाली अजरामर आहेत. गीतरामायण व वीर सावरकर या दोन्ही गोष्टी अजरामर आहेत.

सुनीताबाई देशपांडे : एक फार मोठा गायक, त्याहून मोठा संगीत दिग्दर्शक, ध्येयवेडा आणि आपल्या घरातलाच म्हणावा इतका जवळचा वाटणारा आमचा हा ज्येष्ठ स्नेही. गेल्या ५५ वर्षांच्या काळात प्रत्यक्ष गाठीभेटी अधुनमधूनच व्हायच्या, पण मनात मात्र सदैव वस्तीला हक्काने असायचा. पत्नी एकेकाळची पार्श्वगायिका, मुलगा या सुसंस्कृत आणि सुरेल घराच्या ऐश्वर्यात मौल्यवान भर टाकणारा, सून सर्वांची लाडकी, अशी नशीबवान माणसं फारच थोडी असतात. त्यातला एक आज काळाच्या पडद्याआड गेला. त्यांनी संगीत दिलेल्या पहिल्या चित्रपटात काम करण्याची संधी मला लाभली होती हे केवढं मोठं भाग्य होतं याची आज प्रकर्षाने जाणीव होतेय.

सरस्वती राणे : बाबूजींची आणि माझी १९४१ सालापासून ओळख होती. नागपूरला सीताकांत लाड यांच्याकडे आम्ही एकत्र वास्तव्यास होतो. त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मी गायलेली 'घनश्याम नयनी आला', 'जा घेऊनी संदेश पाखरा', 'नयनी तुझ्या आसू येतील का' यासारखी गाणी खूप गाजली. त्यांच्या निधनामुळे मला फार वाईट वाटते आहे. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो.

सुरेश भट: रामायणाचे सूर व शब्द हरपले...

बिंदुमाधव जोशी : हिंदुत्व, संघ आणि सावरकर या त्रिवेणी संगमावर सुधीर फडके नावाच्या एका साधकाने ८३ वर्षे तपस्वी जीवन जगून आज स्वर्गारोहण केले आहे. बाबूजींनी आपल्या निष्ठा शेवटपर्यंत अभंग ठेवल्या. ख्यातनाम गायक, संगीत दिग्दर्शक, सिनेक्षेत्रातील एक कलावंत असे सर्व असूनही सुधीर फडके यांनी निर्लेप जीवन जगून आपले स्वयंसेवकत्व सिद्ध केले. आत्मा ओतून त्यांनी गायलेले गीत रामायण, दादरा नगर हवेली सशस्त्र मुक्ती संग्रामात त्यांनी केलेले नेतृत्व, ग्राहक पंचायतीच्या चळवळीत झोकून देऊन त्यांनी स्वीकारलेले महाराष्ट्राचे अध्यक्षपद, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या चित्रपटासाठी त्यांनी घेतलेला ध्यास, अशा देदीप्यमान घटना घडविणारा हा एक कर्मयोगी होता. एक अकृत्रिम सच्चा बंधुतुल्य मित्र आज मी गमावला आहे. परवाच मुंबईला रुग्णालयात जाऊन या सहोदराचे दर्शन मी घेतले. त्यांनी डोळे उघडले पण त्यावेळी त्यांचे नेत्र पैलतिरी लागले होते. सुधीर
फडके त्यांच्या जीवना
गेले आहेत. या गाण्य
पावन पूजा में। हम के
स्वरतीर्थाचा एक बिंदू म

चंद्रकांत काळे : 'साध
गाताना गळ्याला त्या
येईल अशा चाली बाबू
भावसंगीताचा मोठा काव
आहे. सुधीर फडके म्हण

गजाननराव वाटवे :
चित्रपट मी पहिल्याच
बाबूजींनी गायलेले 'सा
गाणं इतकं प्रभावी गायले
नाही. मी माझ्या सहका
की हे गाणं याच चालं
दुसऱ्या चाली शोभत
आल्यावर मी ओक्साबो
बाबूजींच्या संपूर्ण कष्टाचं
लगेच त्याच सायंकाळी
चित्रपट पाहिल्याचे सांगि
माझे ३८ सालापासून
मतभेदांमुळे आम्ही
आमच्यातील प्रेम तसूभर
बाबूजी गेल्याचे दुःख हो
लागताहेत, पण 'सावर
त्यांना जे कष्ट भोगावे ल

साद बिन लादेन आता अल् काईदाचा प्रमुख

रियाध, २९ जुलै : आंतरराष्ट्रीय दहशतवादी ओसामा बिन लादेन याचा मोठा मुलगा साद बिन लादेन याने अल् काईदा संघटनेची सूत्रे हाती घेतल्याचे 'अश्रक अल् अवस्थ' या अरबी दैनिकाने वृत्त दिले आहे.

अफगाणिस्तानात अल् काईदाविरुद्ध अमेरिकेने मोहीम सुरू केल्यानंतर सादने ही सूत्रे घेतल्याचे वृत्तात म्हटले आहे. अमेरिकेच्या हल्ल्यात ओसामा बिन लादेन हा एक तर ठार झाला असावा अथवा गंभीरपणे जखमी झाला असावा, असा निष्कर्ष या घटनेवरून काढता येऊ शकतो, असेही वृत्तात म्हटले आहे. यापूर्वीच्या घटनांनुसार ओसामाचा दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा महमद हा खरे तर ओसामाचा वारसदार होणार होता. अल् कायदाबाहेर साद हा फारसा कोणाला ठाऊक नाही, असे या वृत्तपत्राने म्हटले आहे.

तांग-सिन्हा भेट

बीजिंग : एशियन (असोसिएशन ऑफ

परराष्ट्रमंत्री तांग जियाझुआन हे आज येथून ब्रुनेईला रवाना झाले. तेथे भारताचे परराष्ट्रमंत्री यशवंत सिन्हा यांच्यासह काही परराष्ट्रमंत्र्यांशी स्वतंत्रपणे चर्चाही करणार आहेत. या बैठकीस चीन, जपान, दक्षिण कोरिया आदी नऊ देशांचे परराष्ट्रमंत्री हजर राहणार आहेत. याच बैठकीच्या वेळीस यशवंत सिन्हा यांच्याशी तांग हे भारत-चीन परस्पर संबंधावर चर्चा करतील. प्रादेशिक तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरही भारत-चीन यांची समान भूमिका कुठे असेल, यावरही ते चर्चा करतील, असे अधिकृत सूत्रांकडून सांगण्यात आले.

संक्षिप्त विदेश

जहाजातून तेल गळती

ब्रिस्बेन : कोळसा घेऊन सिंगापूरमार्गे भारताकडे निघालेल्या ग्रीक जहाजातील तेलाची गळती सुरू झाल्याने ते अडचणीत सापडल्याचे प्राथमिक वृत्त आहे. अद्याप त्याला फारसा दुजोरा मिळत नाही. मदत नौका तेथे पाठविण्यात आली आहे, असे ऑस्ट्रेलियाच्या किनारा सुरक्षा दलाकडून सांगण्यात आले. त्या जहाजावर २२ कर्मचारी, ५३ हजार मेट्रिक टन कोळसा व ३७५ मेट्रिक टन डिझेल तेल आहे.

ब्रिटिश-पाक युद्धनौकांच्या कवायती

इस्लामाबाद : ब्रिटिश आणि पाकिस्तानी युद्धनौकांनी आज कराचीजवळ संयुक्तपणे कवायती केल्या. या कवायती अतिशय अवघड अशा होत्या, असे कॅप्टन आणि कमांडिंग ऑफिसर आय. एफ. कोर्डर यांनी वार्ताहरांना सांगितले. ब्रिटिश युद्धनौका 'एचएमएस कंबरलॅण्ड' ही पाकिस्तानच्या सदिच्छा भेटीवर आली आहे. ब्रिटनच्या ताफ्यातील वापरलेली युद्धनौका खरेदी करण्यास पाकिस्तानने तयारी दर्शविली असल्याचे कॅप्टन अॅण्ड्रू वेल्स यांनी सांगितले.

पाक निवडणुकीसाठी अमेरिकन निरीक्षक

इस्लामाबाद : पाकिस्तानमध्ये १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी निरीक्षक व निवडणूकविषयक प्रशिक्षित तज्ज्ञ पाठविण्याची तयारी अमेरिकेने दर्शवली आहे. पाकिस्तानमधील निवडणुका लोकशाही नियमानुसार व्हाव्यात अशी अमेरिकेची इच्छा असल्याचे अमेरिकेच्या परराष्ट्र राज्यमंत्री ख्रिस्तिना रोक्का यांनी सांगितले.

- (वृत्तसंस्था)

संगीत
पासक
ठेवून
शब्दांत
फडके
निधन
टाच्या
त मला
जरामर
दोन्ही
ायक,
आणि
वळचा
ा ५५
धूनच
हक्काने
मुलगा
श्वर्याते
डकी,
सतात.
गेला.
काम
ं मोठं
य.
९४१
ाकांत
होतो.

'संगीत शारदेचा समर्पित स्वरोपासक गेला'

त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मी गायलेली 'घनश्याम नयनी आला', 'जा घेऊनी संदेश पाखरा', 'नयनी तुझ्या आसू येतील का' यासारखी गाणी खूप गाजली. त्यांच्या निधनामुळे मला फार वाईट वाटते आहे. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो.

सुरेश भट: रामायणाचे सूर व शब्द हरपले...

बिंदुमाधव जोशी : हिंदुत्व, संघ आणि सावरकर या त्रिवेणी संगमावर सुधीर फडके नावाच्या एका साधकाने ८३ वर्षे तपस्वी जीवन जगून आज स्वर्गारोहण केले आहे. बाबूजींनी आपल्या निष्ठा शेवटपर्यंत अभंग ठेवल्या. ख्यातनाम गायक, संगीत दिग्दर्शक, सिनेक्षेत्रातील एक कलावंत असे सर्व असूनही सुधीर फडके यांनी निर्लेप जीवन जगून आपले स्वयंसेवकत्व सिद्ध केले. आत्मा ओतून त्यांनी गायलेले गीत रामायण, दादरा नगर हवेली सशस्त्र मुक्ती संग्रामात त्यांनी केलेले नेतृत्व, ग्राहक पंचायतीच्या चळवळीत झोकून देऊन त्यांनी स्वीकारलेले महाराष्ट्राचे अध्यक्षपद, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या चित्रपटासाठी त्यांनी घेतलेला ध्यास, अशा देदीप्यमान घटना घडविणारा हा एक कर्मयोगी होता. एक अकृत्रिम सच्चा बंधुतुल्य मित्र आज मी गमावला आहे. परवाच मुंबईला रुग्णालयात जाऊन या सहोदराचे दर्शन मी घेतले. त्यांनी डोळे उघडले पण त्यावेळी त्यांचे नेत्र पैलतिरी लागले होते. सुधीर फडके त्यांच्या जीवनाचे एक गाणे मागे सोडून गेले आहेत. या गाण्याचे बोल आहेत 'माँ, तेरी पावन पूजा में। हम केवल इतना कर पाये।। या स्वरतीर्थाचा एक बिंदू म्हणून माझी श्रद्धांजली.

चंद्रकांत काळे : 'साध्या, सोप्या वाटणाऱ्या पण गाताना गळ्याला त्यातले अवघडपण लक्षात येईल अशा चाली बाबूजींनी दिल्या. महाराष्ट्रीय भावसंगीताचा मोठा काळ त्यांनी आपल्याला दिला आहे. सुधीर फडके म्हणजे केवळ ग्रेट.'

गजाननराव वाटवे : बाबूजींचा 'सावरकर' चित्रपट मी पहिल्याच दिवशी पाहिला. त्यामध्ये बाबूजींनी गायलेले 'सागरा प्राण तळमळला' हे गाणं इतकं प्रभावी गायले आहे की, त्याला तोडच नाही. मी माझ्या सहकाऱ्यांना त्यावेळी म्हणालो, की हे गाणं याच चालीत गायला हवं, त्याला दुसऱ्या चाली शोभत नाहीत. चित्रपट पाहून आल्यावर मी ओक्साबोक्शी रडलो, आनंदाने. बाबूजींच्या संपूर्ण कष्टाचं चीज झालं असं वाटलं. लगेच त्याच सायंकाळी बाबूजींना फोन करून चित्रपट पाहिल्याचे सांगितले. तसे बाबूजींचे आणि माझे ३८ सालापासूनचे संबंध. पण वैचारिक मतभेदांमुळे आम्ही बाजूला झालो. पण आमच्यातील प्रेम तसूभरदेखील कमी झालं नाही, बाबूजी गेल्याचे दुःख होत आहे, यातना सोसाव्या लागताहेत, पण 'सावरकर' चित्रपट काढताना त्यांना जे कष्ट भोगावे लागले त्यामुळेच त्यांचे आयुष्य कमी झाले.

डॉ. श्रीराम लागू : स्वातंत्र्यवीर सावरकरांवर चित्रपट निर्माण करण्यासाठी फडकेंनी अथक परिश्रम घेतले. हे स्वप्न त्यांचे पूर्ण झाले. राज्याच्या सांस्कृतिक मानदंडापैकी ते होते. महाराष्ट्र सदैव त्यांचा ऋणी राहील.

वसंत बापट : फडके यांच्या निधनाने सामान्य माणसाच्या जीवनातील आनंद नाहीसा झाला आहे.

शैला दातार : परवाच मुंबईला जाऊन बाबूजींची भेट घेतली. माझी आई लीला सरदेसाई बाबूजींकडे गायली. माणिक वर्मा माझ्या गुरु होत्या. त्या बाबूजींना गुरु मानायच्या. शास्त्रीय संगीताची त्यांना बैठक असल्यामुळे प्रत्येक गाणे अजरामर झाले. त्यांच्या निधनाने कलाकारांचा आधार गेला.

मुकुंद अनगळ : 'सावरकर' चित्रपटासाठी पुणे शहरातून गोळा करण्यात आलेला निधी बापूजींकडे सुपूर्द करण्याचा पहिला कार्यक्रम पुणे मराठी ग्रंथालयात झाला होता. तेव्हापासून सुधीर फडके व ग्रंथालयाचे संबंध अधिक दृढ होत गेले. त्यांच्या रूपाने एक जाज्वल्य हिंदुत्व अभिमानी गेला.

बाबासाहेब पुरंदरे : अत्यंत क्लेशकारक घटना आहे. कालचं गोवा मुक्ती संग्रामातील अग्रणी राजाभाऊ वाकणकर आमच्यापासून दुरावले आणि आज सुधीर फडके आम्हाला सोडून गेले. मला अजूनही ते दिवस आठवतात. आम्ही सगळे मिळून फारफारतर १०० सैनिक असू. बाबूजींच्या हाती एक व्हायोलिन ठेवण्याची सुंदर पेटी होती. मला ते पाहून आश्चर्य वाटले. परंतु, 'बाबासाहेब व्हायोलिनचे सूर वेगळेच आहेत', असे म्हणून त्यांनी पेटी उघडली तेव्हा त्यात एक 'लाईट मशिन गन' होती. गोवा मुक्ती संग्रामात त्यांनी दिलेल्या योगदानाचा त्यांनी आपल्या आयुष्यात उल्लेखही केला नाही. पोर्तुगालच्या कारागृहात खितपत पडलेल्या या मुक्तीसंग्रामातील दोन क्रांतिकारकांना सोडविण्याकरिता त्यांनी प्रयत्न केले आणि त्यांना भारतात आणले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मानसपुत्र असलेल्या बाबूजींनी त्यांच्यावर चित्रपट काढला आणि पित्याच्या ठायी असलेले आपले कर्तव्य पूर्ण केले. निस्सीम राष्ट्रभक्ती आणि अवीट संगीत यामुळे बाबूजींना विसरणे केवळ अशक्य आहे.

भास्कर चंदावरकर : सुधीर फडके यांनी मराठी संगीतात एक युग निर्माण केले होते. त्यांच्या जाण्याने एक युगकर्ता संगीतकार मराठी संगीताने गमाविला आहे. त्यांनी संगीतबद्ध केलेले गीतरामायण हे मराठी संगीतामधील उत्कट योगदान आहे.

सूर्यकांत पाठक: बाबूजी हे युगनिर्माता संगीतसाधक होते. ग्राहक चळवळीतील अनेक तरूण कार्यकर्त्यांना ते पितृतुल्य होते. त्यांच्या निधनाने ग्राहक चळवळीतील आमचा आपुलकीचा झरा नाहिसा झाला आहे. ■

काईदाचा प्रमुख

सांगण्यात आले. त्या जहाजावर २२ कर्मचारी, ५३ हजार मेट्रिक टन कोळसा व ३७५ मेट्रिक टन डिझेल तेल आहे.

ब्रिटिश-पाक युद्धनौकांच्या कवायती

इस्लामाबाद : ब्रिटिश आणि पाकिस्तानी युद्धनौकांनी आज कराचीजवळ संयुक्तपणे कवायती केल्या. या कवायती अतिशय अवघड अशा होत्या, असे कॅप्टन आणि कमांडिंग ऑफिसर आय. एफ. कोर्डर यांनी वार्ताहरांना सांगितले. ब्रिटिश युद्धनौका 'एचएमएस कंबरलॅण्ड' ही पाकिस्तानच्या सदिच्छा भेटीवर आली आहे. ब्रिटनच्या ताफ्यातील वापरलेली युद्धनौका खरेदी करण्यास पाकिस्तानने तयारी दर्शविली असल्याचे कॅप्टन अॅण्डू वेल्स यांनी सांगितले.

पाक निवडणुकीसाठी अमेरिकन निरीक्षक

इस्लामाबाद : पाकिस्तानमध्ये १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी निरीक्षक व निवडणूकविषयक प्रशिक्षित तज्ज्ञ पाठविण्याची तयारी अमेरिकेने दर्शवली आहे. पाकिस्तानमधील निवडणुका लोकशाही नियमानुसार व्हाव्यात अशी अमेरिकेची इच्छा असल्याचे अमेरिकेच्या परराष्ट्र राज्यमंत्री ख्रिस्तिना रोक्का यांनी सांगितले.

- (वृत्तसंस्था)